# जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीला महाराष्ट्रात प्रथम 'डिजिटल' होण्याचा मान

रत्नागिरी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'डिजिटल इंडिया'ची घोषणा केली आहे. या घोषणेला मूर्त स्वरूप देत जिल्हा रुग्णालयानेही 'डिजिटल' पाऊल पुढे टाकत रुग्णालयाच्या रक्तपेढीचे २० एप्रिलपासून पूर्णतः संगणकीकरण केले आहे. 'पेपरलेस' होणारी सार्वजनिक आरोग्य सेवेतील महाराष्ट्रातील ही पहिलीच रक्तपेढी ठरली आहे.

सामान्यांचे रुग्णालय म्हणून येथील जिल्हा रुग्णालयाकडे पाहिले जाते. त्यामुळे या रुग्णालयात विविध आजाराच्या रुग्णांची मोठी गर्दी असते. या रुग्णांना मोठ्या प्रमाणावर रक्तपुरवठा करावा लागतो. 'थॅलेसेमिया'सारखा दुर्धर आजार, मातांची शस्त्रक्रिया, प्रसुती, अपघात आदींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. 'थॅलेसेमिया'च्या रुग्णाला दर महिन्याला रक्तपुरवठा करावा लागतो, तोही निःशुल्क. त्यामुळे जिल्हा रुग्णालयात रक्ताचा पुरवठा कायम ठेवण्याचे आव्हान या रक्तपेढीला पेलावे लागते.

वाढती रुग्णसंख्या लक्षात घेऊन या रक्तपेढीतील सुविधा अधिक जलदगतीने होण्यासाठी दोन वर्षांपासून जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. बाळासाहेब आरगुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. पराग पाथरे आणि त्यांच्या रक्तपेढीच्या टीमच्या प्रयत्नाने या रक्तपेढीचे रुपडेच बदलून टाकले. उपलब्ध मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि काम यांचा सुरेख मेळ साधण्यासाठी दोन वर्षांपासून गुणवत्ता नियंत्रण पद्धत अमलात आणली आहे. त्यामुळे रक्तसंकलनाची पारंपरिक पद्धत बंद होऊन या रक्तपेढीचा 'हायटेक' प्रवास सुरू झाला.


रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीमधील सर्व कामे 'पेपरलेस' करण्यात आली आहे. आरोग्य सेवेतील ही पहिलीच रक्तपेढी ठरली आहे.

रक्तपेढीतील जेलकार्ड सिस्टीममुळे रक्तगट, क्रॉसमॅचिंग, अँटिबॉडी, स्क्रीनिंग, अँटिबॉडी आयडेंटिफिकेशन आदी महागड्या चाचण्या आता या रक्तपेढीत निःशुल्क होत आहेत. रक्तगटाचे उत्तर येणे, घेणाऱ्याही चाचण्यांचा दुष्परिणाम झाला तर त्याची कारणमीमांसा करण्यासाठी आवश्यक असलेली सामग्रीही केवळ या जिल्हा रुग्णालयातच उपलब्ध आहेत.

बारकोड पद्धतीमुळे आता रक्तदाता किंवा रुग्ण यांचा इलेक्ट्रॉनिक डाटा तयार होणार आहे. त्याचबरोबर किती वेळा रक्त संकलन झाले, किती वेळा वितरण झाले, किती घटक तयार झाले, शिबिरात किती रक्त संकलन झाले याचबरोबर आता रक्तदात्यांची यादी, त्यांचे संपर्क क्रमांक, पत्ते, रुग्णांची सविस्तर माहिती आदी एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. एवढेच नव्हे तर रक्तदात्याला तीन महिन्यानंतर 'आपण रक्तदान करू शकता' असा आरोग्याचा संदेशही मिळणार आहे.

रुग्णांना अधिकाधिक सुविधा मिळाव्यात या धडपडीतून रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाची रक्तपेढी 'डिजिटल' झाली आहे. आता 'मेट्रो रक्तपेढी' म्हणून श्रेणीवर्धन होण्यासाठी जिल्हा रुग्णालयाचे प्रयत्न सुरू आहेत. सध्या महाराष्ट्रातील सातारा, नांदेड, परभणी, पुणे आदी आठ ठिकाणच्या सार्वजनिक आरोग्य सेवेतील रक्तपेढ्या 'मेट्रो' झाल्या आहेत. कोकणात एकतरी रक्तपेढी 'मेट्रो' होणे गरजेचे आहे. रत्नागिरीतील जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीचा 'हायटेक' प्रवास पाहता ही रक्तपेढी यासाठी पात्र ठरू शकते. सध्या या रक्तपेढीत अत्याधुनिक सुविधांबरोबरच संगणकीकरणही झाले आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक असलेल्या रक्तपेढी तज्ज्ञांची पदे वाढवण्याची गरज आहे. त्यादृष्टीने आरोग्य संचालनालयाकडून पूर्तता होणे गरजेचे आहे.

या अत्याधुनिक प्रणालीमुळे या रक्तपेढीचे कार्य आंतरराष्ट्रीय निर्दोष होऊ लागले आहे. रक्त विघटन केंद्रामुळे विविध रक्तघटक रुग्णांना माफक दरात उपलब्ध होत आहेत. मात्र, त्यासाठी आवश्यक माहितीची नोंद करण्यासाठी अनेक रजिस्टर तयार ठेवावी लागत होती. कमी मनुष्यबळ असल्याने आहे त्या कर्मचाऱ्यांनाच नोंद लिहून ठेवावी लागत होती.

त्यामुळे रक्तपेढीचे पूर्णतः संगणकीकरण करण्यात आले असून, रक्तपिशव्या, रक्तनमुने यांना 'बारकोडिंग' करण्यात येत आहे. रक्तसंकलनापासून ते अगदी रक्तपुरवठ्यापर्यंतची प्रत्येक प्रक्रिया बारकोड पद्धतीने अमलात आणली जाणार आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या संगणक, प्रिंटर, स्कॅनरसाठी जिल्हा नियोजनमधून निधी मिळाला आहे. एक सर्व्हर आणि त्याच्याशी संलग्न पाच संगणक जोडण्यात आले आहेत. ही यंत्रणा जोडण्यासाठी औरंगाबादच्या 'टाईड्स सॉफ्टवेअर'चे पंकज राठोड, सागर कुंडे, योगेश धुने यांचे मार्गदर्शन लाभले आहे. ही यंत्रणा जोडून पूर्ण झाली असून, या रक्तपेढीचे 'डिजिटलायझेशन' झाले आहे.

रक्तपेढीत कार्यरत असणारे शल्यचिकित्सक डॉ. गजानन रहाटे, अधिपरिचारिका एस. एस. मंचू (प्रभारी), जनसंपर्क अधिकारी कृष्णात माळवी, रक्तपेढी तंत्रज्ञ मनाली डांगरकर, योगेश सावंत, विक्रम चव्हाण, मानसिंग शेळके, अमिता भोंडे, साई सावंत, सुजाता ढवळकर, प्रियांका बेटकर, संदीप पवार, कृष्णा मळ्यांनी ही सर्व धडपड आता या रक्तपेढीला 'मेट्रो' बनवण्यासाठी धडपडत आहेत. (प्रतिनिधी)

Scanned by CamScanner